# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

दिनांक : २७/०२/२०२४

## नाली बांधकामाचे बिल काढण्यासाठी २४ हजारांची लाच स्विकारतांना ग्रामसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.मुखेड गुरनं ६७/२०२४ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक २७/०२/२०२४ रोजी ००.१२ वा. स्टे.डा नोंद नं ०२ वर |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | कृष्णा तुकाराम रामदिनेवार वय ३८ वर्ष पद ग्रामसेवक, सज्जा सांगवी भादेव ता.मुखेड जि. नांदेड रा. अंबुलगा बु. ता. मुखेड जि. नांदेड वर्ग ०३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,००० /– रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | २४,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे मौ. सांगवी भादेव, ता.मुखेड जि. नांदेड येथील वार्ड क्र.०१ मधील दलीत वस्तीमधील सांडपाण्याच्या नालीचे कामासाठी रुपये ५,००,०००/– ( रुपये पाच लाख ) निधी मंजुर झाला होता. मंजुर झालेल्या निधीमधुन तक्रारदार यांनी दलित वस्तीमधील झालेल्या नालीचे कामाचे बिल मिळाल्यानंतर यातील आलोसे ग्रामसेवक कृष्णा रामदिनेकर यांनी ५ टक्के म्हणजे २५,०००/–रुपये त्यांना द्यावे लागतील असे म्हणाले. सदरची २५,०००/– रुपये रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाल्याने त्यांना ती देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली.<br>आज दिनांक २६/०२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणीसाठी पाठविले असता, आरोपी लोकसेवक ग्रामसेवक कृष्णा रामदिनेकर यांनी पंचासमक्ष २५,०००/– रुपये ची मागणी करुन तडजोडीअंती २४,०००/– रुपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन लोकसेवक यांनी पंचासमक्ष २४,०००/– रुपये मुखेड लातुर महामार्गावरील राजेश बार अँड रेस्टॉरंट मुखेड, जि. नांदेड येथे लाच स्विकारली. त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड पथकाने रंगेहाथ पकडले.<br>आरोपी लोकसेकव ग्रामसेकव कृष्णा रामदिनेकर यांना ताब्यात घेण्यात आले असुन पो.स्टे.मुखेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड चे पोलीस अधीक्षक डॉ.राजकुमार शिंदे, अपर पोलीस अधीक्षक रमेशकुमार स्वामी, यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधीक्षक राजेंद्र पाटील, तसेच सापळा कार्यवाही पथक पोलीस निरीक्षक जमीर नाईक, सपोउपनि गजेंद्र मांजरमकर,पोहेकॉ किरण कणसे, पोकॉ/ईश्वर जाधव, चापोना/प्रकाश मामुलवार, सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | जमीर नाईक, पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

<table>
<tr><td colspan="2">संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड</td></tr>
<tr><td>संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064</td><td>ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net</td></tr>
<tr><td>मा. पोलीस अधीक्षक 9623999944</td><td>पोलीस उपअधीक्षक 7350197197</td></tr>
<tr><td>ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in</td><td>ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in</td></tr>
<tr><td>FACEBOOK – Dysp Acb Nanded</td><td>TWITTER - @ACBnanded</td></tr>
<tr><td colspan="2">INSTAGRAM – acb_nanded</td></tr>
</table>

कार्यालय.पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड.युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner